**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार**

**न्यायालयीन भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः राकेश दिलीप महामुनी,

वयः४१ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः भुवनेश्वर, रोहा, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. दि.२६/११/२०१९ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशन, रोहा येथे पंचनामा करण्याकरीता बोलाविले हाते. तेथे बोलेरो पिकअप गाडीमध्ये मागचे बाजूला दोन गाई व दोन कालवट कोंबलेले होते. पोलीस कर्मचारी श्री.मदगे यांनी मला सदर गाडी दाखविली. सदर गाडीचा नोंदणी क्र. एम एच–०६/बी जी ३८८५ होता. तिचेवर निळ्या रंगाची ताडपत्री टाकलेली होती. तेथे पोलीसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. डी. एम. वर्मा यांच्यामार्फत सुरू.**

०२. मी खाजगी कंपनीमध्ये नोकरी करतो. माझी कामाची वेळ तीन शिफ्टमध्ये बदलत राहते. हे म्हणणे खरे आहे की, माझे घरापासून पोलीस स्टेशन रोहा अंदाजे एक कि.मी.अंतरावर आहे, पोलीस स्टेशनचे आजूबाजूला लोकवस्ती आहे, फिर्यादी अंकित मोहिते, रोशन चाफेकर माझे मित्र आहेत.

०३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मित्रांचे सांगण्यावरून मी पोलीसांनी तयार केलेल्या पंचनाम्यावर सह्या केल्या, त्यांचे सांगण्यावरून मी आज न्यायालयात साक्ष देण्याकरीता आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.06.14 17:49:51 +0530

स्थळ : रोहा.
दि.१४.०६.२०२३.

(एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.